अपर पोलीस महासंचालक
व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला, पुणे ४११ ००१
दुरध्वनी ०२० २६१२४८१५
फॅक्स ०२० २६१२५८७८
ई-मेल-igoffice.oandm-mh@gov.in

---

**परिपत्रक/महत्वाचे**

जा.क्र.अपोमसंवकामनि/पुणे/इप्र/.३०३ प्रशिक्षण/ 12092 २०१८/कक्ष-६ दि. 21.१२.२०१८

विषय: **.३०३ रायफल, ७.६२ एसएलआर रायफल प्रशिक्षण व सरावाबाबत.**

उपरोक्त विषयान्वये कळविणेत येते की, राज्यातील कारागृहांना सुरक्षिततेच्या दृष्टिने .३०३ रायफल व ७.६२ एसएलआर रायफलचे सर्व कारागृहांना वाटप करण्यात आलेले असून सदरचे शस्त्र हाताळण्यापूर्वी नवनियुक्त कर्मचारी यांना त्याबाबतचे पायाभूत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्याकरिता खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. कारागृह विभागातील कारागृह शिपायांना .३०३ व ७.६२ एसएलआर रायफलचा वापर करता येणे आवश्यक आहे. करीता अधीक्षकांनी त्यांचे कारागृहातील सर्व नवनियुक्त कारागृह शिपायांना .३०३ व ७.६२ एसएलआर रायफल चालविण्याचे पायाभूत प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षणाकरीता निवड केलेला प्रशिक्षणार्थी निर्व्यसनी व मानसिक व शारिरीकदृष्टया तंदुरुस्त असावा.
२. कारागृह अधीक्षकांनी आपले कारागृहाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले नवनियुक्त अप्रशिक्षित कारागृह शिपाई यांचे .३०३ व ७.६२ एसएलआर रायफलचे प्रशिक्षण आयोजित करणेकामी प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे- ४११ ००६ यांचेशी संपर्क साधावा.
३. .३०३ व ७.६२ एसएलआर रायफलची ओळख, खोलणे, जोडणे याबाबत प्रथम प्रशिक्षण अभ्यास पूर्ण करुन घेण्यात यावा.
४. पायाभूत प्रशिक्षणानंतर प्रत्येक कर्मचा-यास १० राऊंड प्रमाणे गोळीबाराचा सरावही करुन घेण्यात यावा.
५. कारागृह शिपाई पूर्ण प्रशिक्षित झालेनंतर करागृहाचे नियमित गार्डसोबत .३०३/७.६२ एसएलआर रायफलसह १ कर्मचारी २४ तास (आळीपाळीने) पहारा देईल अशी व्यवस्था करण्यात यावी. तसेच अप्रशिक्षित कारागृह शिपाई यांना कोणत्याही परिस्थितीत प्रशिक्षणाशिवाय शस्त्र हाताळण्यास परवानगी देऊ नये.
६. कारागृह अधीक्षकांनी कारागृहाच्या शस्त्रागारात सद्यस्थितीत असलेल्या शस्त्रांची संख्या लक्षात घेऊन कारागृह नियमावलीतील तरतुदीनुसार तदूसंबंधित दारूगोळा साठा राखीव ठेवावा.
७. प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांनी अधिनस्थ असलेल्या कारागृहनिहाय केलेल्या कार्यवाहीचा वेळोवेळी आढावा घ्यावा.

**( राजवर्धन )**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१

**प्रति,**

अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह/जिल्हा/विशेष/खुले कारागृह (सर्व)
प्राचार्य, दौलतराव जाधव तुरूंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे
प्राचार्य, किशोर सुधारालय, नाशिक
संपर्क अधिकारी, खुली वसाहत, आटपाडी, सांगली.

**प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.**

१) विशेष पोलीस महानिरीक्षक व कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई.

२) कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, येरवडा, पुणे.

३) कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद

४)कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर.